सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८८

# मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत (हुकूमनामे कायदेशीर ठरविण्याबाबत) अधिनियम, १९५८

(दिनांक ६ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. LXXXVIII OF 1958**

# The Bombay Hindu Divorce (Decrees Validation) Act, 1958

(As modified upto 6th November 2006)

*

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रुपये ३.२० ]

S(H) 1204

# मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत (हुकूमनामे कायदेशीर ठरविण्याबाबत) अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. विवक्षित हुकूमनामे कायदेशीर ठरविणे.

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८८

[मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत (हुकूमनामे कायदेशीर ठरविण्याबाबत) अधिनियम, १९५८]

[मा. राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रात" तारीख २३ ऑक्टोबर १९५८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

**मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९४७ आणि सौराष्ट्राचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९५२ यान्वये दिलेले घटस्फोटाबाबतचे विवक्षित हुकूमनामे कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम.**

१९४७ चा मुंबई २२. १९५२ चा सौराष्ट्र ३०. १९५५ चा २५.

ज्याअर्थी, मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९४७, आणि सौराष्ट्राचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९५२ यात सतत चार वर्षे त्याग करणे हे घटस्फोट देण्यासाठींचा मुद्दा आहे अशी तरतूद केलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियम, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ यावरून निरसित करण्यात आले होते;

१९५५ चा २५.

आणि ज्याअर्थी, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ याच्या प्रारंभापूर्वी सतत चार वर्षे त्याग करण्यात आलेल्या काही व्यक्तींनी अशा प्रारंभानंतर घटस्फोटासाठी दावे दाखल केले आणि त्यांना घटस्फोटाबाबतचे हुकूमनामे देण्यात आले होते;

आणि ज्याअर्थी, सन १९५६ चे नादारीतील अपील क्रमांक ९४, सन १९५६ चा विवाहविषयक क्षेत्राधिकार दावा क्रमांक ८६ (सीताबाई रामचंद्र तोडणकर विरुद्ध रामचंद्र रघुनाथ तोडणकर) यात, मुंबई येथील उच्च न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी क्षेत्राधिकाराविरुद्ध केलेल्या अपिलात उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने (फुल बेंचने) असा निकाल दिला की, अशा रीतीने देण्यात आलेले घटस्फोट अवैध होते;

आणि ज्याअर्थी, याप्रमाणे नियमबाह्य रीतीने कित्येक घटस्फोट देण्यात आलेले आहेत आणि त्याप्रमाणे हुकूमनामे आणि आदेश देण्यात आलेले आहेत असे आढळून आले आहे;

आणि ज्याअर्थी, याप्रमाणे नियमबाह्य रीतीने देण्यात आलेले असे घटस्फोटाबाबतचे हुकूमनामे आणि त्यास अनुषंगिक असलेले आदेश कायदेशीर ठरविणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी यावरून पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

१. या अधिनियमास मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत (हुकूमनामे कायदेशीर ठरविण्याबाबत) अधिनियम, १९५८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव

१९४७ चा मुंबई २२. १९५२ चा सौराष्ट्र ३०.

२. (१) मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९४७ आणि सौराष्ट्राचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९५२, हे हिंदू विवाह अधिनियम, १९५५ यावरून रद्द करण्यात आलेले असले तरीही किंवा शेवटी उल्लेख केलेल्या अधिनियमांत कोणताही मजकूर असला तरीही किंवा कोणत्याही न्यायालयाच्या निकालपत्रात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही असले तरीही, सतत चार वर्षे विवक्षित हुकूमनामे कायदेशीर ठरविणे.

त्याग करण्यात आल्याच्या मुद्यावर मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९४७ किंवा सौराष्ट्राचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९५२ यान्वये हिंदू विवाह अधिनियम, १९५५ याच्या प्रारंभानंतर परंतु ३ जुलै १९५७ पूर्वी दाखल केलेल्या दाव्यात एखाद्या न्यायालयाने दिलेला घटस्फोटाबाबतचा कोणताही हुकूमनामा, तसेच अशा न्यायालयाने पोटगीबाबत, सामाईक मालमत्तेच्या विल्हेवाटीबाबत, अवयस्क मुलांच्या अभिरक्षेबाबत, पालनपोषणाबाबत, किंवा शिक्षणाबाबत किंवा अशा घटस्फोटाचा हुकूमनामा देण्यास परिणामभूत किंवा आनुषंगिक असलेल्या कोणत्याही मदतीबाबत दिलेले सर्व आदेश हे, जणू काही असा दावा हिंदू विवाह अधिनियम, १९५५ याच्या प्रारंभापूर्वी दाखल केलेला असल्याप्रमाणे कायद्यात निर्दोष व वैध आहेत असे समजण्यात येईल; आणि घटस्फोटाबाबतचा असा हुकूमनामा आणि त्यास परिणामभूत किंवा अनुषंगिक असलेले आदेश हे, अशा घटस्फोटाबाबतचा दावा, मुंबईचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९४७ किंवा यथास्थिति सौराष्ट्राचा हिंदूंच्या घटस्फोटाबाबत अधिनियम, १९५२, हे हिंदू विवाह अधिनियम, १९५५ यावरून निरसित करण्यात आल्यानंतर दाखल करण्यात आलेला होता, आणि परिणामी घटस्फोट मिळण्यासंबंधीचा कोणताही हक्क उक्त अधिनियम अशा रीतीने निरसित करण्यात आल्यामुळे अस्तित्वात राहिला नव्हता, याच केवळ मुद्यावर अवैध आहेत असे समजता कामा नये.

१९५५ चा २५.
१९५५ चा २५.
१९४७ चा मुंबई २२.
१९५२ चा सौराष्ट्र ३०.
१९५५ चा २५.

(२) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे सन १९५६ चे नादारातील अपील क्रमांक ९४, सन १९५६ चा विवाह विषयक क्षेत्राधिकार दावा क्रमांक ८६ (सीताबाई रामचंद्र तोडणकर विरुद्ध रामचंद्र रघुनाथ तोडणकर) यात, मुंबई येथील उच्च न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी क्षेत्राधिकाराविरुद्ध केलेल्या अपिलात, उक्त न्यायालयाने दिलेल्या निकालपत्रास, हुकूमनाम्यास किंवा आदेशास बाध येणार नाही.

१९४७ चा मुंबई २२.
१९५२ चा सौराष्ट्र ३०.
१९५५ चा २५.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६